**पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा,**
**पुणे शहर**
**यांचे कार्यालय,बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**
Email- dcptraffic.pune@nic.in

जा. क्र.अपोआ/वाचक-२/६४३५/२०२४, पुणे शहर दिनांक :- ११/०९/२०२४

# प्रेसनोट

पुणे शहरातील वाहन चालकांनी वाहतूकीचे नियम पाळण्याकरीता वाहतूक शाखेकडून विशेष कारवाई करण्यात येत आहे. विशेष कारवाई मध्ये मोटार वाहन कायद्याअंतर्गत अशा रॉंग साईड व ट्रिपल सीट वाहन चालविणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

सदर विशेष कारवाई अंतर्गत दि.०७/०९/२०२४ ते दि.१०/०९/२०२४ या कालावधी मध्ये रॉंग साईडने वाहन चालविणा-या एकूण १०६६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून ३,१७,०००/- रू. दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच नमूद कालावधीमध्ये ट्रिपल सीट वाहन चालविणारे एकूण २१०१ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांचेकडून २०,९९,०००/- रू. दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे सदर विशेष कारवाई अंतर्गत दि.०१/०८/२०२४ ते दि.३१/०८/२०२४ या कालावधीमध्ये रॉंग साईडने वाहन चालविणा-या एकूण ६७५० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून २३,३३,५००/- रू. दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच नमूद कालावधीमध्ये ट्रिपल सीट वाहन चालविणारे एकूण ४८५९ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांचेकडून ४७,२०,०००/- रू. दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

अशाप्रकारे दि.०१/०८/२०२४ ते दि.१०/०९/२०२४ या कालावधीमध्ये रॉंग साईडने वाहन चालविणारे व ट्रिपल सीट वाहन चालविणारे एकूण १४७७६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून ९४,६९,५००/- रू. दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. अशा नियमभंग करणारे वाहन चालकांचे वाहन परवाने निलंबित करण्याची प्रक्रिया वाहतूक शाखेकडून करण्यात येत आहे.

**( अमोल झेंडे )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रत:- सर्व संबंधीतांना**



